# प्रेस नोट

कोरेगाव पार्क, सेंट्रल पार्क हॉटेलजवळ, बंगलो नं.१० येथे अब्बा इन्स्टिटयूट ऑफ म्युझिक नावाने म्युझिक क्लासचे इन्स्टिटयूट दि.०१/०८/२०१८ पासून सुरू होत आहे. सध्या सदर ठिकाणी म्युझिक सेटअप व इंटेरियर डेकोरेटरची तयारी चालू आहे. सदर ठिकाणी गिटार, पियानो, व्हायोलीन, ड्रम्स इ. वस्तू मुलांना शिकवण्यासाठी ठेवलेले आहेत. सदर इन्स्टिटयूट ही यातील फिर्यादी श्रीकुमार सिल्वराज स्टीव्ह, वय ५१ वर्षे, संगीत शिक्षक, रा.नसरा पॅलेस, टिंगरे नगर, पुणे. मूळ गाव म्हैसूर हॉल, नं.१५, मारीकुपूम पोस्ट, जि.कोलार, कर्नाटक हे चालवणार आहेत.

दि.२१/०७/२०१८ रोजी दुपारी ०३.०० वा. सुमारास तीन अनोळखी इसम ॲडमिशनच्या बहाण्याने आले. तेव्हा त्यांना फिर्यादी श्रीकुमार स्टीव्ह यांनी सध्या ॲडमिशन चालू नसल्याचे सांगितले. तेव्हा सदर इसमांनी त्यांना तुमची पत्नी, मुलगी, मेव्हुणा हया सर्वांची आम्हास माहिती आहे. त्यावेळी श्रीकुमार स्टीव्ह यांनी त्यांना तुम्ही कोण आहात, असे विचारले असता त्यातील एका व्यक्तीने त्यांना हाताने मारहाण करून ६ लाख रूपयाची मागणी केली. तेव्हा त्यांनी पैसे नसल्याचे सांगितले. तेव्हा त्यांनी जीवे मारण्याची धमकी देवून त्यांचेकडून जबरदस्तीने त्यांचेजवळील रोख ४,५०० रू., एटीएम कार्ड, पॅन कार्ड, आधार कार्ड, गिटार तसेच एटीएम कार्डद्वारे ३०००/- रू. असा १,२७,५००/- रू. च्या वस्तू व रोख रू. तसेच जबरदस्तीने ४,५०,०००/- रूपयाचा सही केलेला चेक घेतला व त्यांना त्यांचे कारमध्ये घालून विमानतळ रस्ता, सिंबायोसिस कॉलेजचे मैदानावर घेवून गेले व ६ लाख रू. ची व्यवस्था करण्यास सांगून पोलीसांकडे तक्रार दिल्यास जिवे ठार मारण्याची धमकी दिली. त्यांच्या क्रूर वागण्यामुळे फिर्यादी श्रीकुमार स्टीव्ह हे भयभीत झाले. नमूद इसम हे फोनवरून वेळोवेळी त्यांना ६ लाख रूपयाची मागणी करीत होते.

दि.२६/०७/२०१८ रोजी नमूद आरोपींनी फिर्यादीकडे ६ लाख रूपयाची मागणी करून, पैसे घेण्यासाठी येत असल्याचे सांगून पैसे तयार ठेव अन्यथा जीवंत सोडणार नाही, अशी धमकी दिली. त्यामुळे फिर्यादी यांनी कोरेगाव पार्क पोलीस ठाणे येथे येवून पोलीसांना सविस्तर हकीगत सांगितली. त्यावेळी पोलींसानी सापळा रचून आरोपी (१) अतुल रतन क्षेत्रे, वय ३७ वर्षे, रा.सी १, फ्लॅट नं.१२०५, प्राईड वर्ल्ड सिटी, लोहगाव, पुणे (२) अनिकेत अशोक ओव्हाळ, वय ३२ वर्षे, रा.१०१, शुभम सोसायटी, धानोरी जकात नाका, लोहगाव, पुणे (३) सनी दिपक शेट्टी, वय २६ वर्षे, रा.३७/२, प्लॉट नं.९, वैभव कॉलनी, टिंगरेनगर, पुणे हे फिर्यादी यांचे ऑफिसमध्ये ६ लाख रूपये घेण्यासाठी आले असता त्यांना सापळा रचून पकडले आहे. सदर आरोपीतांविरूद्ध फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून कोरेगाव पार्क पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.७५/२०१८, भा.दं.वि. कलम ३९२,३८४,३६३,३२३,५०४,३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे व आरोपींना दाखल गुन्हयात अटक करण्यात आलेली आहे.

नमूद गुन्हा हा मा.श्रीमती ज्योति प्रिया सिंह सो., पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-२, पुणे शहर, मा.श्रीमती जयश्री गायकवाड सो., सहा.पोलीस आयुक्त, लष्कर विभाग, पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली श्री.मदन बहाद्दरपुरे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, कोरेगाव पार्क पो.स्टे.पुणे शहर, गणेश माने, पोलीस निरीक्षक, गुन्हे, प्रकाश लंघे, सहा.पोलीस उप निरीक्षक तसेच कर्मचारी दिनेश शिंदे, विनोद साळुंके, संदीप गायकवाड, रियाज शेख, अनिल मंदे, गणेश गायकवाड, संदिपकुमार गर्जे, निशीकांत सावंत यांनी सापळा रचून आरोपीतांना पकडून नमूद गुन्हा उघडकीस आणला आहे.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक
कोरेगाव पार्क पो.स्टे.पुणे शहर